भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२७२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १५/०४/२०१७

**१) संगनमत करुन थापड बुक्यांनी,दगडाने ,डोक्यावर व दोन्ही भवईवर मारुन जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०४/२०१७ चे १८.०० ते १८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी बाळा झिबल सराटे वय ४९ वर्ष, रा. रावनवाडी ह. मु. महादेव मानापुरे यांचे घरी अडयाळ हा आपले टिप्पर मध्ये माती भरुन आपले साईडवर जात असतांनी यातील आरोपी यांनी आपली मारोती व्हॅन ने टिप्पर ट्रकचे मागेहुन ड्रायव्हर साईडने ओव्हरटेक करुन मारोती व्हॅनचे ब्रेक जोरात दाबल्याने मारोती व्हॅन पल्टी झाली तेव्हा आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे साईडवर जावुन फिर्यादीला ट्रक मधुन ओढुन थापड बुक्यांनी व दगडाने त्याचे उजव्या बाजुला डोक्यावर व दोन्ही भुवईवर मारुन जखमी केल्याने फिर्यादी यांचे तोंडी व डॉ. रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३२४,३४ भांदवि. अन्वये गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. कठाणे पोलीस स्टेशन अडयाळ हे करीत आहे.

**२) संगनमत करुन साडयाची व स्लीपची चोरी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०४/२०१७ चे १६.०० वा. दरम्यान यातील अनोळखी ४ महीलांनी फिर्यादीचे दुकानात जावुन महाग फॅन्सी साडया दाखवा असे बोलुन अंगात घातलेल्या साडीच्या पेटीकोट मध्ये ३ नग साडया बॅगलोर स्लीप प्रत्येकी ५,०००/–रु. एकुण १५,०००/–रु. ५ नग साडया प्रत्येकी ३,०००/–रु. एकुण १५,०००/–रु. असा एकुण ३०,०००/–रु. चा माल चोरुन नेल्याने फिर्यादी गोपाल बंसीलाल चावडी वय ५७ वर्ष, रा. अशोक नगर अडयाळ यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन अडयाळ येथे कलम ३८०,३४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. नंदेश्वर पो.स्टे. अडयाळ हे करीत आहेत.

**३) घरात अनाधिकृतपणे प्रवेश करुन मुलीचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १३/०४/२०१७ चे २४.०० वा. दरम्यान यातील फिर्यादी ही आपले घराचे मागील छपरात चुलत भाऊ याचे सोबत खाटेवर झोपली असतांना यातील आरोपीने कुणीही नसल्याची संधी साधुन फिर्यादीचे घरात अनाधिकृतपणे प्रवेश करुन फिर्यादीचा विनयभंग केल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन कारधा येथे कलम ४४८,३५४ भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि. मेश्राम पो.स्टे. कारधा हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**४) चारचाकी वाहन चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकलला धडक देवुन दोघांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक १४/०४/२०१७ चे १८.२० वा. दरम्यान यातील फिर्यादी जितेन्द्र सेवन भगत वय २१ वर्ष रा. येरली वडील सेवन भगत वय ५० वर्ष व आई सौ. शशीकला वय ४५ वर्ष हे मोटार सायकलने येरली वरुन बळपाणी म. प्र. येथे जात असता आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन हयगयीने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल ला देवनारा येथे धडक मारुन फिर्यादीचे आई व वडील यांना जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने व अपघाताची सुचना न देता पळुन गेल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४,१३४,१८७ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**५) मॅक्स गाडी चालकांच्या निष्काळजीपणामुळे मोटार सायकलला धडक देवुन एकास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :—**

दिनांक १३/०४/२०१७ चे ०८.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी सौ. कल्पना अरुण भुरे वय ३३ वर्ष रा. कुशारी याचा पती जखमी अरुण भुरे हा आपले मोटार सायकलने ने कुशारी कडुन मोहाडी कडे येत असतांनी यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील वाहन भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीचे पतीचे मोटार सायकल ला कुशारी फाटा येथे धडक देवुन जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने फिर्यादी यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन मोहाडी येथे कलम २७९,३३७ भादंवि. सहकलम १८४ मोवाका अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. गिऱ्हेपुंजे पो.स्टे. मोहाडी हे करीत आहेत.

**६) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून ठेवल्याने गुन्हा नोंद:—**

दिनांक १४/०४/०१७ चे १७.०० ते १७.३० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील ट्रक गांधी चौक पवनी येथील सार्वजनीक ठिकाणी येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. पवनी येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. रामटेके पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :—**

दिनांक १२/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली ५२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०२, त्यापैकी तीन सिटर वाहनांवरती ०४ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ४६ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

प्रभारी पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ८८०५६५७२६२

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.